**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे**
नवीन प्रशासकीय इमारत, विधान भवना समोर, तळ मजला पुणे 001 411 -
फोन 26052432-020 -ईमेल -do.5igro@igrmaharashtra.gov.in

क्र.का.5/मुद्रांक-20/प्र.क्र.10/20/ 217/2020 दिनांक 31/08/2020

**प्रति,**

अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई व
सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक

विषय - मुद्रांक शुल्काच्या प्रचलित दरांमध्ये कपात करण्याबाबत.

संदर्भ - 1. महाराष्ट्र शासन निर्णय क्र.झेडपीए2020/प्र.क्र.44/पंरा-1 दि. 28/08/2020.
2. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब क्र. 196 दि. 29/08/2020.
3. महाराष्ट्र शासन निर्णय क्र.एमसीओ-2020/प्र.क्र.119/नवि-14. दि. 31/08/2020.
4. शासन पत्र क्र मुद्रांक-2020/प्रक्र-136/म-1(धोरण) दि. 31/08/2020

विषयांकित प्रकरणी संदर्भीत 1 ते 3 अन्वये महाराष्ट्र शासन राजपत्र तसेच शासन निर्णयाची प्रत सोबत जोडली आहे. उक्त राजपत्रातील व शासन निर्णयातील नमूद दस्तऐवजावर दिलेल्या विहीत कालावधीकरीता मुद्रांक शुल्काची सवलत देण्यात आली आहे. उक्त निर्णयामध्ये देण्यात आलेल्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा. उक्त संदर्भीत आदेश व शासन निर्णयाच्या संदर्भात खाली नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

1. मुंबई व मुंबई उपनगर -

| दस्ताचा प्रकार | सध्याचा मुद्रांक शुल्काचा दर | दि. 01/09/2020 ते दि. 31/12/2020 या कालावधीकरीता मुद्रांक शुल्क दर | दि. 01/01/2021 ते दि. 31/03/2021 या कालावधीत आकारावयाचा दर |
|---|---|---|---|
| स्थावर मिळकतीबाबतच्या अभिहस्तांतरणपत्र किंवा विक्रीकरार पत्राच्या दस्तऐवजावर अनुसूची-1 च्या अनुच्छेद 25च्या खंड(ब) अन्वये आकारण्यात येणाऱ्या मुद्रांक शुल्काबाबत | 5% | 2% | 3% |

2. मुंबई व मुंबई उपनगर सोडून उर्वरित महाराष्ट्रातील महानगरपालिका, नगरपालिका, कटक मंडळे व मुंबई महानगर विकास प्राधिकरणातील ग्रामीण भाग -

अ)

| दस्ताचा प्रकार | सध्याचा मुद्रांक शुल्काचा दर | दि. 01/09/2020 ते दि. 31/12/2020 या कालावधीकरीता मुद्रांक शुल्क दर | दि. 01/01/2021 ते दि. 31/03/2021 या कालावधीत आकारावयाचा दर |
|---|---|---|---|
| स्थावर मिळकतीबाबतच्या अभिहस्तांतरणपत्र किंवा विक्रीकरार पत्राच्या दस्तऐवजावर अनुसूची-1 च्या अनुच्छेद 25च्या खंड(ब) अन्वये आकारण्यात येणाऱ्या मुद्रांक शुल्काबाबत | **5%** | 3% | 3.5% |

ब) महानगरपालिका व नगरपालिका मधील स्थानिक स्वराज्य संस्था अधिभार (L.B.T.) व मुंबई महानगर विकास प्राधिकरणातील ग्रामीण भागाकरीता जिल्हा परिषद अधिभार(Z.P.) -

| दस्ताचा प्रकार | सध्याचा (LBT) व (ZP) दर | दि. 01/09/2020 ते दि. 31/12/2020 या कालावधीकरीता (LBT) व (ZP) दर | दि. 01/01/2021 ते दि. 31/03/2021 या कालावधीकरीता (LBT) व (ZP) दर |
|---|---|---|---|
| अभिहस्तांतरणपत्र | 1% | 0% | 0.5% |
| दान | 1% | 0% | 0.5% |
| फलोपभोगी गहाणखत | 1% | 0% | 0.5% |

3. बाजारमुल्य दर तक्त्यामधील प्रभाव क्षेत्रामधील नमूद गांवे (ग्रामीण भाग) -

अ)

| दस्ताचा प्रकार | सध्याचा मुद्रांक शुल्काचा दर | दि. 01/09/2020 ते दि. 31/12/2020 या कालावधीकरीता मुद्रांक शुल्क दर | दि. 01/01/2021 ते दि. 31/03/2021 या कालावधीत आकारावयाचा दर |
|---|---|---|---|
| स्थावर मिळकतीबाबतच्या अभिहस्तांतरणपत्र किंवा विक्रीकरार पत्राच्या दस्तऐवजावर अनुसूची-1 च्या अनुच्छेद 25च्या खंड(ब) अन्वये आकारण्यात येणाऱ्या मुद्रांक शुल्काबाबत | **5%** | 3% | 3.5% |

ब) प्रभाव क्षेत्र (ग्रामीण) भागाकरीता जिल्हा परिषद अधिभार(Z.P.) -

| दस्ताचा प्रकार | सध्याचा (ZP) दर | दि. 01/09/2020 ते दि. 31/12/2020 या कालावधीकरीता (ZP) दर | दि. 01/01/2021 ते दि. 31/03/2021 या कालावधीकरीता (ZP) दर |
|---|---|---|---|
| अभिहस्तांतरणपत्र | 1% | 0% | 0.5% |
| दान | 1% | 0% | 0.5% |
| फलोपभोगी गहाणखत | 1% | 0% | 0.5% |

4. ग्रामीण क्षेत्र (प्रभाव क्षेत्र वगळून) -

| दस्ताचा प्रकार | सध्याचा मुद्रांक शुल्काचा दर | दि. 01/09/2020 ते दि. 31/12/2020 या कालावधीकरीता मुद्रांक शुल्क दर | दि. 01/01/2021 ते दि. 31/03/2021 या कालावधीत आकारावयाचा दर |
|---|---|---|---|
| स्थावर मिळकतीबाबतच्या अभिहस्तांतरणपत्र किंवा विक्रीकरार पत्राच्या दस्तऐवजावर अनुसूची-1 च्या अनुच्छेद 25च्या खंड(ब) अन्वये आकारण्यात येणाऱ्या मुद्रांक शुल्काबाबत | **4%** | 2% | 2.5% |

ब) ग्रामीण (प्रभाव क्षेत्र वगळून) भागाकरीता जिल्हा परिषद अधिभार(Z.P.) -

| दस्ताचा प्रकार | सध्याचा (ZP) दर | दि. 01/09/2020 ते दि. 31/12/2020 या कालावधीकरीता (ZP) दर | दि. 01/01/2021 ते दि. 31/03/2021 या कालावधीकरीता (ZP) दर |
|---|---|---|---|
| अभिहस्तांतरणपत्र | 1% | 0% | 0.5% |
| दान | 1% | 0% | 0.5% |
| फलोपभोगी गहाणखत | 1% | 0% | 0.5% |

वरील संदर्भ क्र. 1 ते 3 चे शासन निर्णय / राजपत्रातील तसेच संदर्भ क्र. 4 चे पत्रातील शासन निर्देशांचे काटेकोरपणे पालन करणेबाबत आपले अधिनस्त सर्व सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी यांचेमार्फत सर्व दुय्यम निबंधकांना सूचना देण्यात याव्यात.

**सोबत - संदर्भ क्र. 1 ते 4 च्या प्रती.**

**(ओमप्रकाश देशमुख)**
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत - कार्यासन अधिकारी म-1 महसूल व वन विभाग मंत्रालय मुंबई.